अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. ४ सप्टेंबर २०२४ ।



## लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार करणाऱ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा इशारा

**मुंबई** : राज्यात सध्या लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरले जात आहेत. दोन कोटीहून अधिक महिलांना या योजनेसाठी पात्र ठरवण्यात आलं आहे. मात्र, या योजनेच्या अर्जप्रक्रियेदरम्यान गैरप्रकार झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. साताऱ्यात एका व्यक्तींने ३० जणांच्या आधार कार्डचा गैरवापर करून तब्बल ३० अर्ज भरले आहेत. तर पनवेलमध्ये व्यक्तीने एका महिलेचा वेगवेगळ्या पोशाखात फोटो वापरून अर्ज भरला आहे. दरम्यान, या घटनानंतर आता गैरप्रकार करणाऱ्यांना थेट मुख्यमंत्र्यांनी इशारा दिला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्यांना या घटनांबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी असून यात गैरप्रकार करणाऱ्यांना तुरुंगात टाकलं जाईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

या योजनेत कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. साताऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी मी चर्चा केली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी आहे. यात कोणीही भ्रष्टाचार केला, तर तो खपवून घेतला जाणार नाही. आरोपींना थेट तुरुंगात टाकलं जाईल, असा इशारा त्यांनी दिली.

# पगार देणाऱ्या नवऱ्याचे बायको ऐकत नाही, तेव्हा महायुतीच्या सरकारचे कोण ऐकते

## खा.प्रणिती शिंदे यांनी लगावला टोला

सोलापूर/प्रतिनिधी

**महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जुगलबंदी सुरूच आहे.सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी या योजनेवरून सरकारला टोला लगावला. ''नवरा सगळा पगार देतो, त्याचे बायको ऐकत नाही तर ह्या सरकारचे कोण ऐकते,अशी उपरोधिक टीका त्यांनी केली.**



नगर जिल्ह्यातील संगमनगर येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी इंदिरा महोत्सवाचे आयोजन केले होते.त्यावेळी त्या बोलत होत्या.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक या वर्षी होणार आहे. या निवडणुकीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही तरीही दिवाळीनंतर निवडणूक लागेल अशी चिन्हे आहेत. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना यावेळी रंगणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे ३० खासदार निवडून आले त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. तर महायुतीचा महाराष्ट्रात जो पराभव झाला त्यामुळे त्याांनीही विधानसभा जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. या सगळ्या धामधुमीत एका योजनेची चर्चा रंगली आहे. ती योजना म्हणजे लाडकी बहीण योजना.

लाडकी बहीण योजना निवडणुकीपुरती आहे, निवडणूक झाल्यानंतर ही योजना महायुती सरकार आले तर ते बंद करेल असं महाविकास आघाडीचे नेते जाहीरपणे सांगत आहेत. तर दुसरीकडे सावत्र भावांपासून सावध राहा असा टोला महायुतीचे नेते मविआला लगावत आहेत. ही योजना पुन्हा चर्चेत येण्याचे कारण आहेत खासदार प्रणिती शिंदे. प्रणिती शिंदेंनी एक जोक सांगून या योजनेवरुन सरकारची फिरकी घेतली आहे.

### आणखी काय म्हणाल्या प्रणिती शिंदे?

''जे सरकार छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करु शकते, त्यांच्याबाबत काय बोलणार? बदलापूरच्या घटनेतही लोकांना रस्त्यावर उतरावे लागले. अघोषित आणीबाणी निर्माण झाली आहे. निवडणूक व्हायला हवी होती. पण ती पण झालेली नाही. शिवाजी महाराजांचा पुतळा निकृष्ट दर्जातून उभारला होता. प्रताप गडावर पंडीत नेहरुंनी अनावरण केलेला पुतळा अद्यापही मजबूत आहे. मात्र आठ महिन्यांत राजकोटचा पुतळा कोसळला. कारण या सरकारने यातही पैसे खाल्ले'' असा आरोप प्रणिती शिंदेंनी केला आहे.

### प्रणिती शिंदे काय म्हणाल्या?

प्रणिती शिंदे म्हणाल्या की, ''बाळासाहेब थोरात यांच्या शब्दापुढे मी जाऊ शकत नाही. संगमनेरला आल्यावर घरी आल्यासारखे वाटते. सोलापूर माझे गाव असले तरी संगमनेर माझ्यासाठी घरच आहे. मी आमदार, खासदार झाले मात्र, महिलांसाठी एवढा मोठा कार्यक्रम मी सुद्धा करू शकले नाही. गृहिणी खूप हुशार आहेत. त्याांच्या उत्पादनांना मार्केट आता उभे राहिले आहे. महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महिला एकत्रित आल्या तर शक्तीपीठ निर्माण होतं'', असे प्रणिती शिंदे म्हणाल्या.

## आरोपी अद्याप फरार का?

### बदलापूर घटनेवरुन हायकोर्टाचे पोलिसांवर ताशेरे

मुंबई/प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाने बदलापूर बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनेवरुन मंगळवारच्या सुनावणीत राज्य सरकारला फटकारे. बदलापूर प्रकरणावरून हायकोर्टाने दाखल केलेल्या सुमोटो याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने ही घटना गंभीरतेने न घेत, निष्काळजी कारभार करणाऱ्या बदलापूर पोलिसांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणातील आरोपी अद्यापही फरार असल्याचा मुद्दा उपस्थित करत पोलिसांना चांगलेच फैलावर घेतले.

केस डायरीतून बदलापूर पोलिसांचा निष्काळजीपण हायकोर्टात उघड झाल्याचे पाहायला मिळाले. केवळ याच प्रकरणात नाही तर पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक तपासाकडे गंभीरतेने पाहण्याची गरज असल्याचे सांगत हायकोर्टाने बदलापूर पोलिसांना फैलावर घेतले. बदलापूर प्रकरणात आरोपपत्र घाईघाईनं दाखल करण्याची चूक करू नका. या घटनेची सखोल चौकशी करा, आणखीन माहिती समोर येण्याची शक्यता आहे, अशा सूचनाही न्यायालयाने दिल्या आहेत. तसेच, फरार आरोपींच्या शोधात अद्याप यश न येणे ही खेदाची बाब असून तपासयंत्रणेच्या कारभारावर देखील हायकोर्टाने नाराजी व्यक्त केली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर आदर्श विद्यालयचे अध्यक्ष उदय कोतवाल, सचिव तुषार आपटे अद्यापही फरार आहेत. त्यामुळे पोलिसांनी आरोपींना अद्यापही अटक न केल्याबद्दलही न्यायालयाने तपास यंत्रणांना विचारणा केली आहे.

राज्यस्तरीय समिती स्थापन करून राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या एकंदरीत सुरक्षेबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देशही उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. तसेच, या समितीत निवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव अथवा डॉ. शालिनी फणसाळकर-जोशी यांच्यासह निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांच्या नावांचा विचार करण्याची प्रशासनाला सूचना न्यायालयाकडून देण्यात आली आहे.

## पत्नी आणि मेव्हुण्यास चाकूने मारहाण

**माळशिरस** : सासरी मारहाण करीत असल्याने पतीला घेऊन माहेरी आलेल्या पत्नी आणि मेव्हण्यास चाकूने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले . ही घटना निमगाव मगर (ता .माळशिरस) येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली . या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी अभिजीत पंढरीनाथ हांडे (रा. पिसेवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .

या संदर्भात ओंकार शिवाजी गाडेकर (वय २६ रा.निमगाव मगर) याने वेळापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. ओंकार गाडेकर यांची बहीण अनुष्का हिला तिच्या पती अभिजीत हांडे हा नेहमी भांडण करून मारहाण करीत होता . त्यामुळे अनुष्का हि पतीला घेऊन निमगाव येथे माहेरी आली होती. रविवारी रात्रीच्या सुमारास हांडे दांपत्यात भांडण झाले. त्यावेळी त्याने चाकू घेऊन पत्नीला मारहाण केली . तर भांडण सोडविण्यास आलेल्या पृथ्वीराज गाडेकर (मेहुणा) याला देखील त्याने चाकूने मारून गंभीर जखमी केले. आणि दोघांनाही सोडत नाही असे म्हणून त्याने धमकी दिली. पुढील तपास फौजदार राऊत करीत आहेत.

## बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशी; ममता बॅनर्जी सरकारचे नवे विधेयक मंजूर

कोलकाता/वृत्तसंस्था

पश्चिम बंगाल सरकारने महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसेच लैंगिक अत्याचार, शोषण आणि बलात्काराच्या घटनांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नवे विधेयक आणले आहे.

या विधेयकातली महत्वाची तरतूद म्हणजे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपीला फाशी दिली जाणार आहे. बलात्कार आणि शोषणाच्या घटनांच्या विरोधात हे विधेयक आणण्यात आले होते हे विधेयक ममता सरकारने मंजूर केले आहे. विधानसभेत हे विधेयक मांडण्यात आले जे सगळ्याच आमदारांनी एकमुखाने मान्य केलं.

अपराजिता वुमन चाईल्ड बिल असे या विधेयकाचे (पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक २०२४) नाव आहे. या विधेयकावर चर्चा करण्यासाठी दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे.

मागच्या महिन्यात ९ तारखेला आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय या ठिकाणी एका डॉक्टर महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. या घटनेने सगळा देश हादरला. या प्रकरणानंतर आता कायदे कठोर करण्याच्या दृष्टीने ममता सरकारने हे नवं विधेयक आणले, ज्या विधेयकाला आता मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**तरतुदी काय आहेत? :** बलात्कार, सामूहिक बलात्काराच्या आरोपींना जन्म ठेपेची शिक्षा देण्यात यावी. ही शिक्षा त्याचा मृत्यू नैसर्गिकरित्या होत नाही तोपर्यंत असेल. त्याचप्रमाणे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपींना फाशी दिली जाईल. बलात्कार प्रकरणाचा तपास अहवाल २१ दिवसांच्या आत आला पाहिजे. जर २१ दिवसांत तपास पूर्ण झाला नाही तर तपास पूर्ण करण्यासाठी आणखी १५ दिवसांची मुदतच वाढवून मिळेल. या १५ दिवसांच्या कालावधीत जो तपास केला जाईल तो पोलीस अधीक्षक आणि त्यावरच्या पदावरचे अधिकारी यांच्या नेतृत्वातच केला जाईल. अशा तरतुदी या विधेयकात आहेत.

## कुर्डूवाडी एस.टी. आगारातील कर्मचारी संपात सहभागी

### अनेक बस रद्द, प्रवाशांचे हाल

कुर्डूवाडी/प्रतिनिधी



कुर्डूवाडीः कुर्डूवाडी एस.टी. आगारात संपास बसलेले कर्मचारी.

एसटी बसच्या कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी अचानक संप केला आहे. संपात कुर्डूवाडी एस.टी. आगारातील कर्मचारीही सामील झाल्याने एसटी वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी प्रवाशांचे हाल होत आहेत. लाडक्या बहिणीही एसटी स्टँडवर थांबून आहेत. संपाचा फायदा घेत खाजगी वाहनचालक जादाचे पैसे घेत आहेत. त्यामुळे प्रवाशांतून संताप व्यक्त होत आहे.

एसटी बस कर्मचाऱ्यांनी दि.३ सप्टेंबर रोजी विविध मागण्यांसाठी संप सुरू केला. मागील वेळी दिवाळीत संप केल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रवाशांचे हाल झाले होते. याहीवेळी लांब पल्ल्याच्या बस वाहतूक ठप्प झाली आहे. गणेशोत्सव असल्याने शहरातून खरेदी करून गावाकडे निघालेल्या प्रवाशी बस स्थानकावर आल्यानंतर संप असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे कुर्डूवाडी बस स्थानकावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. मात्र एसटी बस कर्मचाऱ्यांनी अचानक संप केल्याचे समजताच प्रवाशांची धावपळ सुरू झाली. अनेकांनी बाह्यवळण रस्त्यावर जाऊन खाजगी वाहनाने प्रवास सुरू केला. तर अनेकांना माहिती नसल्याने एसटी स्थानकावरच बसून राहिले होते. तसेच रेल्वेला अद्याप जनरल तिकीट मिळत नसल्यामुळे प्रवास करणे शक्य झाले नाही. अनेकांनी रेल्वेने विनातिकीट प्रवास करणे पसंत केले.

### खाजगी वाहन चालकांकडून लूट

एसटी बसचा संप असल्यामुळे प्रवाशांना पर्याय नसल्यामुळे खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे. यावेळी काही वाहन चालक अव्वाच्या सव्वा पैसे घेऊन प्रवाशांची लूट करत असल्याचे सांगितले जात आहे.

## सोरेगाव येथील हॉटेलमध्ये तरुणाची आत्महत्या

**सोलापूर** : विजापूर रोड सोरेगाव येथील एका हॉटेलमध्ये ३५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली . ही घटना आज मंगळवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. निखिल अनिल माने (वय ३५ रा . हेरिटेज अपार्टमेंट, दक्षिण सदर बजार) असे मयताचे नाव आहे. तो सोरेगाव येथील जय मल्हार हॉटेल येथे मजुरीचे कामाला होता. आज मंगळवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह हॉटेल मधील लाकडी वाशाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

## डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे एकाचा मृत्यू

### चौघांवर गुन्हा



सोलापूर/प्रतिनिधी

डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे एकाचा मृत्यू झाल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २ ते ५ एप्रिल २०२४ दरम्यान मीरा हॉस्पिटल यतीमखाना येथे घडली.तब्बल पाच महिन्यानंतर ३ सप्टेंबर २०२४ रोजी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक उमाकांत शिंदे (नेमणूक सलगर वस्ती पोलीस ठाणे सोलापूर शहर) यांच्या फिर्यादीवरून डॉक्टर हर्षल थडसरे (वय-३६), सिस्टर अनिता हदीमनी (वय-३३),हेल्पर आशिष जाधव (वय-२८) व पेशंट संतोष हदीमनी (वय-४२) (सर्व रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रवीण अमृत करंडे (मयत,वय-२७,रा. होमकर नगर,भवानी पेठ,सोलापूर) यांना दारू पिण्याचे व्यसन असल्याने मीरा हॉस्पिटल सर्वसुखी नगर यतीमखाण्या जवळ व्यसनमुक्तीच्या उपचारासाठी दाखल केले होते.त्यावेळी दिनांक.२ एप्रिल २०२४ ते ५ एप्रिल २०२४ रोजी दरम्यान वरील संशयित आरोपी यांनी मयत प्रवीण करंडे यांच्यावर उपचार करताना केलेल्या हलगर्जीपणा व निष्काळजीपणामुळे प्रवीण करंडे यांचा मृत्यू घडून आणल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास मसपोनि.खामकर या करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



योग्य शिक्षा म्हणजे योग्य आळा!!!

कल्याण
125-85-348

मुंबई
669-11-245

# बैलगाडी, ट्रॅक्टर मोर्चा मोहोळबाहेर रोखला मोर्चेकऱ्यांनी रस्त्याच्याकडेलाच ठिय्या मारला

मोहोळ/प्रतिनिधी

अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे यासाठी मोहोळ ते मुंबई येथील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानावर मंगळवारी (दि. ३) निघालेला ट्रॅक्टर, रिक्षा, बैलगाड्या व इतर वाहनांचा मोर्चा पोलिसांनी मोहोळ शहराजवळच रोखल्याने मोर्चेकरांना माघारी फिरावे लागले आहे.

'मोहोळ बचाव संघर्ष समितीचे सदस्य रमेश बारसकर यांनी या मोर्चाची हाक दिली होती. यामुळे संतापलेल्या आंदोलकांनी महामार्गाच्या शेजारीच ठिय्या मारला. वाहतूकीस कोणताही अडथळा न करता चौफेर भाषणबाजी केली. येत्या १० दिवसामध्ये मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक न लावल्यास कुठेही कधीही कसलेही आंदोलन गनिमी काव्याने करण्याचा निर्धार सर्वांनी बोलून दाखवला. प्रत्येकाने मा.आ.राजन पाटील आणि आ. यशवंत माने यांच्यावर टीका केली.

अनगर येथे मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय सर्वांच्याच गैरसोयीचे आहे. ते रद्द होण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी मोहोळ बचाव संघर्ष समिती स्थापन केली आहे. समितीने यापूर्वी धरणे आंदोलन केले आहे. चौघा तरुणांनी सात दिवस उपोषणही केले होते. दरम्यान मुख्यमंत्री शिंदे यांची समितीतील सदस्यांनी मुंबई येथे भेट घेऊन कागदपत्रांसह पूर्ण वस्तुस्थिति सांगितली होती.



**मोहोळ : बैलगाडी टॅक्टर मोर्चा मोहोळबाहेर रोखल्यामुळे महामार्गावर रिक्षांच्या रांगा लागल्या होत्या.**

भेटीत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी लवकरच बैठक आयोजित करून योग्य न्याय दिला जाईल असे आश्वासनही दिले होते. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी उपोषण तात्पुरते स्थगित केले होते. मात्र अद्यापही कुठलाही निरोप व बैठक झाली नसल्याने समितीची निराशा झाली आहे. परिणामी समितीने २७ ऑगस्टपासून धरणे आंदोलन पुन्हा सुरू केले आहे. त्याच आंदोलनाचा भाग म्हणून मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानावर हा मोर्चा काढला होता.

यावेळी दीपक गायकवाड, संजय क्षीरसागर, उमेश पाटील, रमेश बारसकर, सीमा पाटील, महेश देशमुख, विक्रमसिंह देशमुख, सुशील क्षीरसागर, किशोर पवार, मंगेश पांढरे, सत्यवान देशमुख, ॲड.विनोद कांबळे, दिलीप गायकवाड, संगीता पवार यांनी मनोगत व्यक्त केले. वर्षा दुपारगुडे, बाळासाहेब गायकवाड, बिलाल शेख, शिवरत्न गायकवाड, अशोक भोसले यांच्यासह ४०० ते ५०० जण उपस्थित होते.

**१०७ वाहनांचा होता ताफा :** मोर्चासाठी २७ ट्रॅक्टर, ३० बैलगाडी, ५० रिक्षा असा वाहनांचा ताफा सकाळी मुंबईकडे रवाना झाला होता. मात्र पोलिसांनी हा ताफा पुणे महामार्गावरील स्वराज हॉटेलनजीक रोखला. यावेळी निवासी नायब तहसीलदार महसूल सुधाकर धाईंजे आणि पोलीस निरीक्षक सुरेश कुमार राऊत यांना निवेदन देण्यात आले.

## वडदेगाव येथे तरुणाची गळपास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : वडदेगाव (ता.मोहोळ) येथे राहणाऱ्या एका २७ वर्षीय तरुणाने स्वतःच्या शेतात विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. महादेव नागनाथ सुरवसे (वय २७ राहणार वडदेगाव) असे मयताचे नाव आहे. त्याने रविवारी रात्री ८ वाजेच्या सुमारात स्वतःच्या शेतात विष प्राशन केले होते. त्याला सुनील फाळके (भाऊजी) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो आज मंगळवारी सकाळी मरण पावला. तालुका पोलिसात याची नोंद झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## शिक्षण शिकवू नको म्हणून मारहाण

**सोलापूर** : तरुण मुलीला शिक्षण शिकवू नको. असे म्हणत मायलेकीस मारहाण करण्यात आली. ही घटना जुना विडी घरकुल येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. आशा संजय काळे (वय ३७) आणि त्यांची मुलगी वैजयंती काळे (वय १८ दोघी रा.जुना विडी घरकुल) अशी जखमींची नावे आहेत सोमवारी रात्री संजय प्रल्हाद चव्हाण आणि त्याची पत्नी राणी चव्हाण या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.